रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
## महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे –४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१ मेल आयडी - sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/कृ.उ.बा.स./उमेदवारीखर्च/ ६०९ /२०२२. दिनांक : २९/०१/२०२२

**वाचले** :- १.महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद.

२.महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२० दि.१४/०३/२०२०.

३.महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ दि.१६/१२/२०१७ .

**प्रस्तावना** : -

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्याच्यां निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपविण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीत संबंधीत उमेदवाराकडून नामनिर्देशन पत्र, प्रतिभूती ठेव, मतदार यादयांची खरेदी, प्रचार मोहिमेसाठी कार्यालय भाडे, व्यक्तीगत माहितीपत्रक, भिंतीपत्रक, हस्तपुस्तीका, जाहिरात प्रसिध्दी, सार्वजनिक सभा प्रचार, सार्वजनिक सभेसाठी मंडप, सार्वजनिक सभेसाठी जागा, सार्वजनिक सभासाठी ध्वनीक्षेपक, छायाचित्र, व्हीडीओ शुटींग, ध्वनी मुद्रीत कॅसेट, वाहन भाडे, वाहनाकरिता पेट्रोल व वगंण, निवडणुक प्रतिनिधीना दिलेले परिश्रमीक व अल्पोहार, मतमोजणी प्रतिनिधीना दिलेले परिश्रमीक व अल्पोहार व इतर अनुषंगीक बाबीवर खर्च केला जात असल्यामुळे सदर खर्चाची कमाल मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूका पारदर्शक, नि:पक्षपाती, भयमुक्त व मोकळया वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियमांच्या व नियमांच्या तरतुदीशी विसंगत नसतील असे आदेश किंवा निदेश देण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्याअर्थी, प्राधिकरण राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीत उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादा निश्चित करण्याबाबत खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**-: आदेश :-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) व महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) अन्वये प्राधिकरणास प्राप्त अधिकारानुसार कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवाराने निवडणूकीमध्ये करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादा या आदेशाव्दारे खालील प्रमाणे निर्धारीत करणेत येत आहे.

| अ.क्र. | कृषि उत्पन्न बाजार समिती प्रकार | उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा |
|---|---|---|
| १ | कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई | रु. ६.०० लाख |
| २ | विभागीय कृषि उत्पन्न बाजार समिती | रु. ४.०० लाख |
| ३ | प्रादेशिक कृषि उत्पन्न बाजार समिती | रु. २.०० लाख |
| ४ | तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती | रु. १.०० लाख |

१. याव्दारे असेही आदेशीत करण्यात येते की, निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवाराने निवडणूकीत झालेल्या खर्चाचा तपशिल सोबत जोडलेल्या प्रपत्र- अ मधील नमुन्यात ६० दिवसांच्या आत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

२. निवडणूक लढविणा-या उमेदवाराने अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या इसमाने निवडणूकीच्या खर्चाचा स्वतंत्र तपशिल नामनिर्देशन पत्र सादर केलेच्या दिनांका पासून ते निकालाचे दिनांकापर्यंत दोन्ही दिवस धरुन विहीत मुदतीत देणे बंधनकारक राहिल.

३. विहीत मुदतीत खर्चाचा तपशिल सादर न केल्यास अथवा खर्चाच्या मर्यादेचे उल्लंघन झाल्यास फौजदारी स्वरुपाच्या कारवाईस पात्र राहतील. सदरची कारवाई जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी करावी.

४. उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाच्या तपशिलाची पोहोच पावती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वत:च्या सही शिक्यानिधी उमेदवारास दयावी.

५. निवडणूक खर्चाच्या संदर्भातील बाब निहाय खर्चाच्या पावत्या उमेदवाराने देणे आवश्यक राहिल.

६. प्रपत्र - अ मधील खर्चाच्या तपशीला सोबत निवडणूक लढविणा-या उमेदवाराने शपथपत्र सादर करावयाचे असून सदर शपथपत्रामध्ये त्याने केलेल्या सर्व खर्चाचा तपशिल प्रपत्र - अ मध्ये समाविष्ट असुन **'प्रपत्र - अ मधील नमुद केलेल्या खर्चा व्यतिरिक्त इतर कोणताही खर्च केलेला नाही'** असे नमुद करावयाचे आहे.

७. निवडणूक निर्णय अधिका-याने प्रपत्र - अ मधील खर्चाची तपासणी व खात्री करुन निवडणूक लढविणारे उमेदवाराने केलेला खर्च स्वीकारार्ह, अचुक आणि पुर्ण असल्याचे शेरा नमुद करणे बंधनकारक राहील.

८. खर्चाचे संपुर्ण तपशिल निवडणूक निर्णय अधिकारी यांनी तपासणीसाठी मागितल्यास निवडणूक लढविणारे उमेदवाराने सादर करणे बंधनकारक राहिल.

९. निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवाराने स्वतंत्र बॅक खाते उघडून त्या खात्याव्दारेच निवडणूक खर्च करणे बंधनकारक राहील. तसेच त्या खात्याचा संपुर्ण तपशिल देखील निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने .**

**सोबत-** प्रपत्र अ.

23/9/22

**(यशवंत गिरी)**
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति,**

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) (सर्व).

२/- त्यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश त्यांच्या कार्यक्षेत्रात येणा-या सर्व कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निदर्शनास आणावे.

२. संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी

**प्रत सस्नेह रवाना -**

मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.